अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## विराट-अनुष्काला पुत्ररत्न! इन्स्टाग्राम पोस्टमधून दिली गुड न्युज

**मुंबई** : क्रिकेटर विराट कोहली आणि अभिनेत्री अनुष्का शर्मा आई-बाबा होणार असल्याची चर्चा काही दिवसांपासून सुरू होती. अखेर आज सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत त्यांनी या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. विराट-अनुष्काच्या घरी छोट्या पाहुण्याचं आगमन झालं आहे. त्यांनी त्यांच्या बाळाचं नाव 'अकाय' असं ठेवलं आहे.

विराट-अनुष्काने पोस्ट शेअर करत लिहिलं आहे,आम्हाला कळवण्यात अत्यंत आनंद होत आहे की,१५ फेब्रुवारी २०२४ रोजी आम्ही आमच्या दुसऱ्या बाळाचं अर्थात



वामिकाचा लहान भाऊ 'अकाय'चं स्वागत केलं आहे. आमच्या आयुष्यातील या गोड क्षणादरम्यान आम्हाला तुमच्या शुभेच्छा हव्या आहेत. कृपया आमच्या गोपनीयतेचा आदर करा. प्रेम आणि कृतज्ञता. अनुष्का-विराटच्या पोस्टवर नेटकऱ्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. नेटकऱ्यांसह क्रिकेटर आणि बॉलिवूड सेलिब्रिटींनीदेखील कमेंट्स करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

दुसऱ्या प्रेग्नंसीबाबत विराट-अनुष्काने गोपनितया ठेवली होती. सप्टेंबर २०२३ मध्ये अनुष्का दुसऱ्यांदा प्रेग्नंट असल्याची पहिली बातमी समोर आली होती. अभिनेत्रीचे बेबी बंपदेखील दिसून आले. पण तरीदेखील विराट-अनुष्काने यासंदर्भात गोपनियता ठेवली. अखेर आज खास पोस्ट शेअर करत त्यांनी चाहत्यांना गुडन्यूज दिली आहे.

www.surajyadigital.com । बुधवार, दि. २१ फेब्रुवारी २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १४३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# आरक्षणावरून मराठा अन् सरकारमध्ये पुन्हा संघर्ष अटळ

▸ स्वतंत्र आरक्षण धुडकावले, सग्यासोयऱ्यांच्या आरक्षणावर समाज ठाम, मराठ्यांचे झंझावती वादळ आंदोलनाच्या वाटेवर, अंतरवाली सराटीत आज ठरणार आंदोलनाची दिशा

▸ आरक्षणात गाजर दाखविले, आम्ही निवडणुकांमध्ये दाखविण्याचा संतापजनक मराठ्यांचा एल्गार

**मुंबई-सोलापूर/खास प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळाचा ठराव घेऊन सकल मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय आज राज्य सरकारने घेतला. तथापि, या समाजाला स्वतंत्रपणे विशेष १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय राज्यातील मराठा समाजाने धुडकावून लावला. या समाजाची ही मागणीच नव्हती अशी पुस्ती जोडण्यात आली. कुणबी नोंदीच्या आधारे सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्याच्या अंमलबजावणीचा निर्णय न घेतल्याच्या निषेधार्थ, मराठा समाजाने भूमिका बदलली. यातून मराठ्यांचे झंझावती वादळ पुन्हा आंदोलनाच्या दिशेने जाणार आहे. अंतरवाली सराटीत आज आंदोलनाची पुढची दिशा ठरणार आहे.**

विशेष, मराठा समाजाने पुन्हा आंदोलन उभे केल्यास समाज आणि सरकार यांच्यामध्ये संघर्ष उभा ठाकणार आहे. 'मराठा आरक्षणात सरकारने गाजर दाखविले, आता आम्ही निवडणुकीत गाजर दाखवू' असा एल्गार सकल मराठा समाजाने पुकारत पुढच्या लढ्याची तयारी ठेवली आहे. मराठा आरक्षणाचे केंद्र असलेल्या अंतरवाली सराटीत आज आरक्षणाचे नेते श्री. जरांगे-पाटील यांनी समाजाची बैठक बोलावली आहे. या बैठकीत सरकारच्या विरोधात आंदोलन करण्याची पुढची दिशा ठरणार आहे.




**मुख्यमंत्री म्हणाले, तो पण निर्णय घेऊ :** मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली.कुणबी नोंदी निघालेल्यांच्या सग्यासोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या अधिसूचनेवर साधारण सहा लाख हरकती आल्या आहेत. त्या संबंधीची छाननी सुरू आहे. वर्गीकर ण करून संपूर्ण प्रक्रिया राबविली जाईल. प्रशासनामधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जबाबदारी दिली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**नाराज मराठे अंगावर नका घेऊ :** सरकारने राजकारण करण्याची संधी घालवली आहे. एकीकडे ४०० जागा निवडून आणायची स्वप्ने बघता आणि इकडे मराठा समाजाला दुर्लक्ष करता, म्हणजे सरकारने स्वत:च्या हाताने स्वत:चा कार्यक्रम केला असल्याची टोलाही त्यांनी सरकारला लगावला आहे. यासाठी सरकारने सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करावी, अन्यथा आम्हाला लढावेच लागणार आहे. लढल्याशिवाय न्याय मिळणार नाही. त्यामुळे सरकारने मराठ्यांच्या नाराजी लाट अंगावर घेऊ नये, असा इशाराही दिला आहे.



**सोलापूर : येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याजवळ आरक्षणावरुन सरकारचा निषेध करताना सकल मराठा समाजबांधव आणि भगिनी**

### छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठ्यांचा आक्रोश

न टिकणारे १० टक्के स्वतंत्र आरक्षण देण्याची घोषणा केल्याबद्दल सकल मराठा समाज सोलापूर शहर आणि जिल्ह्याचे कार्यकर्ते सोलापुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात राजे शिवछत्रपतींच्या अश्वारुढ पुतळ्याजवळ जमले. समन्वयक माऊली पवार यांच्या नेतृत्वाखाली येथे सरकारच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करुन निषेध व्यक्त करण्यात आला. आरक्षणात सरकारने या समाजला गाजर दाखविले, समाज आता निवडणुकांमध्ये गाजर दाखवेल, असा इशारा देण्यात आला.



तामिळनाडू सरकारने दिलेले आरक्षण वेगळ्या पद्धतीने दिले आहे. त्यांनी ५० टक्यांच्यावर आरक्षण देताना घटना दुरुस्ती केली आहे. ही दुरुस्ती संसदेत होत असते. राज्याला असा अधिकार नाही. काही कायद्यानुसार आपल्या राज्याला असे आरक्षण देता येते. पण त्याला तीन नियम पाळणे बंधनकारक असते. ते तीन निकष पूर्ण करावे लागतील उद्या राज्य शासनाने दिलेला आरक्षणाचा विचार केला तर आता ओबीसी, मुस्लिम आणि इतर सगळे आरक्षण मोजले तर ८२ टक्के आरक्षण जाते. त्यामुळे आता आरक्षणाचा गुंता वाढला आहे. '५० टक्क्यांवर आरक्षण सुप्रीम कोर्टात टिकणार नाही. लोक या आरक्षणाच्या विरोधात लोक कोर्टात जातील.

**- उल्हास बापट, घटनातज्ज्ञ**

### जरांगे-पाटलांचा लोकप्रतिनिधींना इशारा

मराठा समाजाच्या आमदारांनी आणि मंत्र्यांनी या आरक्षणाच्या निर्णयाला पाठिंबा देऊ नये. करोडो मराठा समाजाने तुम्हाला पाठिंबा दिला असताना देखील तुम्ही या आरक्षणाच्या निर्णयावर सरकारला विरोध न करता पाठिंबा देत असाल तर तुम्ही मराठा समाजाच्या विरोधात आहात हे सिद्धच होईल. त्यामुळे जर तुम्हाला आमची गरज नसेल तर आम्हालाही तुमची गरज नाही, असे समजावे, असा इशाराच जरांगे पाटील यांनी मराठा लोकप्रतिनिधींना दिला आहे. हे आरक्षण मोजक्याच लोकांसाठी मिळणार आहे. मराठा समाजाची ही मागणीच नव्हती मराठा समाजाची मागणी ही ओबीसीतून आरक्षण हीच आहे. तसेच सरकारने दिलेले १० टक्के आरक्षण ५० टक्केच्या पुढे जात असल्याने ते टिकेल याची खात्री नाही.

### काही लक्ष्यवेधी नोंदी...

- आरक्षणासंबंधी अपेक्षित निर्णय न झाल्याने मनोज जरांगे-पाटील यांनी काढून टाकले सलाईन
- विशेष अधिवेशनात सग्यासोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या अधिसुचनेच्या अंमलबजावणीचा निर्णय न घेतल्याबद्दल भडकले मनोज जरांगे-पाटील
- राज्य सरकारने स्वतंत्र्य १० टक्के आरक्षण देण्याच्या विधेयकाचा जरांगे-पाटील यांच्यासह राज्यातील तमाम सकल मराठा समाजाकडून निषेध
- एकाच मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्यावर ओबीसी नेते छगन भूजबळ यांचा आक्षेप
- कुणबी नोंदीच्या आधारे सग्यासोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळायलाच हवे, जरांगेंची मागणी
- मराठा आरक्षण विधेयक मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विधान भवनाबाहेर गुलालाची उधळण

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुम्ही पाचगणीला जाणार होतात ना?

| कल्याण |
| --- |
| 479-04-257 |

| मुंबई |
| --- |
| 126-96-150 |

## बार्शी न्यायालयातून पळून गेलेल्या आरोपी आनंद्या काळे याला अखेर अटक

**सुराज्य/सोलापूर**

बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगार आनंद ऊर्फ आनंद्या राजकुमार काळे (वय ३६ रा. कोरफळे ता. बार्शी) हा न्यायालयीन कोठडीत असताना बार्शी न्यायालयातून नैसर्गिक विधीचा बहाणा करून पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळून गेला होता. त्याला ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे.

बार्शी पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यातील सराईत गुन्हेबार आनंद्या काळे याच्या विरुद्ध जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल आहेत. आरोपी बार्शी पोलिसांच्या ताब्यात होता. पोलीस आरोपी आनंद्या काळे यांस दि. ७ डिसेंबर २०२३ रोजी बार्शीच्या सत्र न्यायालयात घेऊन गेले होते. त्याला पुन्हा जिल्हा कारागृहात हजर करण्यासाठी घेऊन जात असताना आरोपी आनंद्या काळे याने पोलिसांना नैसर्गिक विधीचे कारण सांगून पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळून गेला होता.



आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याने पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी आरोपीस अटक करण्याचे आदेश स्थानिक गुन्हेशाखेस दिले होते. या आदेशाचे पालन करून स्थानिक गुन्हेशाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे व त्यांच्या पथकाने आरोपीचा शोध घेत होते. त्यावेळी आरोपी आनंद्या काळे हा बार्शी तालुक्यातील लोडोळे गावाशेजारील त्याच्या नातेवाईकांकडे घरी (शेतामध्ये) येणार आहे, अशी माहिती मिळाली. त्यावेळी स्थानिक गुन्हेशाखेच्या पोलिसांनी त्या ठिकाणी सापळा लावला व आरोपी आनंद्या काळे याला अटक केली. ही कामगिरी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, फौजदार राजेश गायकवाड व स्थानिक गुन्हेशाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

## जागरण गोंधळाच्या कार्यक्रमात सत्तुरने खुनाचा प्रयत्न; चौघांना अटक

### ▪ गिरझणी (ता. माळशिरस) येथील घटना

**सोलापूर** : जागरण गोंधळाचा कार्यक्रमात अपमान केल्याच्या कारणावरून सत्तुर, हॉकीस्टिक आणि काठीने मारहाण करून एका तरुणाचा खुन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ही घटना गिरझणी (ता. माळशिरस) येथे रविवारी घडली.

या प्रकरणात अकलूजच्या पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून चौघांना अटक केली. त्यांना पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. तेजस शिवाजी शिंदे (वय २८ रा.मायनरफाटा, गिरझणी ता.माळशिरस) असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून अकलूजच्या पोलिसांनी पृथ्वीराज जाधव, प्रदीप अनिल तोरणे, विशाल रामचंद्र मदने, सागर लक्ष्मण गुरव, विकास लहू निकम (सर्व रा.पाणिव ता.माळशिरस) आणि त्यांच्या साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करून चौघांना अटक केली. जखमी तेजस शिंदे यांच्या भावकीतील बाळासाहेब शिंदे यांच्या घराजवळ जागरण गोंधळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात पैसे उधळून व्यत्यय आणत होते. त्यावेळी तेजस शिंदे यांनी त्यांना शांत बसून कार्यक्रम पहा असे सांगितले . तेंव्हा बघून घेतो म्हणून सर्वजण निघून गेले. त्यानंतर रात्री साडे अकराच्या वाजेच्या सुमारास येऊन आरोपींनी त्यांच्यावर सत्तुर, हॉकि स्टीक, काठी आणि लाथाबुक्याने मारहाण करून गंभीर जखमी केले. सहाय्यक निरीक्षक चौधरी तपास करीत आहेत.

